ISSN - 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC



# महात्मा फुले यांचे स्त्री विषयक विचार व कार्य

**प्रा. थोरात आर.एन.**
महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा.

म. फुले यांचे मुळ घराणे सातारा जिल्हयातील कटगुण या गावचे होय. परंतु गावातील प्रस्तापिताच्या बरोबर त्यांच्या पणजोबाचे भांडण झाले. ते कुटुंब पुरंदर तालुक्यातील खानवडी गावी स्थानिक झाले. पुढे फुलेंच्या आजोबांचे उदरनिर्वाहासाठी कुटुंबाचे पुणे येथे स्थलांतर करावे लागले. पुढे त्यांचे गोरे हे उपनाव मागे पडून फुले या नावाने ओळखले जाऊ लागले. खानवडी या गावी जोतीरावाचा जन्म गोविंदराव व भिमाबाई यांच्या पोटी १८२७ साली झाला.

वडिलानी सातव्या वर्षी जोतीरावांना शाळेत घातले. गोंदिरावांनी जोतीबा तेरा वर्षाचे असताना त्याचा विवाह नायगाव जि. सातारा येथील नेवसे पाटलांची कन्या सावित्रीबाईशी लाऊन दिला. पुढे शेजारी राहणारे उर्दु शिक्षक गफारबेग मुनशी व धर्माउपदेशक लिजिट साहेब यांनी शिक्षणाचे महत्त्व गोविदरावांना सांगितले. जोतीरावांनी १८४७ साली आपल्या इंग्रजी शाळेतील अभ्यास पूर्ण केला. पुढे जोतीराव एका ब्राहमण मित्राच्या लग्नाला गेले तेथ त्यांचा अपमान झाला. या घटनेचा त्याच्या जीवनावर परिणाम झाला. मानवी समता आणण्यासाठी सामाजिक क्रांती घडून आली पाहिजे व त्यासाठी त्यांनी समाज सुधारण्याचे कार्य हाती घेतले.

या काळातील स्त्री शिक्षण अत्यंत हीन दर्जाचे होते. स्त्रिला जर प्रगतीकडे न्यायाचे असेल तर शिक्षण हाच पर्याय आहे. हे जोतीबानी ओळखले होते. स्त्रीयांना शिक्षण देऊन त्यांना धर्मशास्त्रीय गुलामगीरीतून मुक्त केले पाहिजे असा विचार मांडून त्यानी इ.स. १८४८ मध्ये पुण्याच्या भिडे वाडयात मुलीची पहिली शाळा काढली. तेथे महार, मांग, चांभार, शुद्र व अतिशुद्र समाजातील स्त्रियां शिक्षण घेऊ लगल्या. १८५१ मध्ये बुधवार पेठेत दुसरी शाळा सुरु केली . त्याच वर्षी रस्ता पेठेत तिसरी शाळा काढली. १८५२ मध्ये वेताळ पेठेत चौथी मुलीची शाळा सुरु केली.[१] स्वतंत्रपणे मुलींची शाळा स्थापन करणारे जोतीबा फुले हेच पहिले समाज सुधारक होय. या कामगिरीकडे पाहून ब्रिटिश सरकाने शाल जोडी देऊन त्याचा बहुमान केला.[२]

**विधवा पुर्नविवाह :-** भारतातील पहिले आद्य समाजसुधारक राजाराम मोहन रॉय यांनी सतीच्या चाली विरोधात आवाज उठविला. कारण १८१८ च्या दरम्याण बंगाल प्रांतात ८०० स्त्रिया सती गेल्या. तसेच मुला-मुलीचा विवाह बालपणी होत आसत त्यामुळे बालमृत्येचे प्रमाण जास्त होते. त्यातच कॉलरा, प्लेगने बालविधवांनचे जीवन दु:ख कारक होत असत. समाज्यात विधवाना मानाचे स्थांन नव्हते. बंगालमध्ये रॉय यांनी तर महाराष्ट्रात फुले यांनी विधवा पुर्नविवाहसाठी खुप प्रयत्न केले. विधवांचे जीवन बदलावे त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे. यासाठी त्यांनी विधवा पुर्नविवाहसाठी धडाडीने प्रयत्न केला. आणि तो सत्यात उतरविला. म्हणजेच १८६४ साली पुण्यातील गोखलेयांच्या बागेत एक विधवेचा पुर्नविवाह घडवून आणला. हे त्यांचे सामाजिक बदलाचे क्रांतीकारक पाऊल होते.[३]

**बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना :** विधवांच्या दुष्कृत्यामुळे गुन्हे आणि शोककथा निर्माण होत. ऊक्ती आणि कृती याचा सुंदर संगम झालेले स्वप्नाळू आणि कृतीशील जोतीराव यांनी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आणि आपले मुले तेथे ठेवण्यासाठी बालहत्या प्रतिबंधगृह स्थापन केले. त्यासाठी त्यांनी माहिती देणारी भित्तीपत्रके पुणे शहरात घराघरांवर लावली. त्यात लिहिले ' विधवांनो येथे येऊन गुप्तपणे व सुरक्षितपणे बाळंत व्हा.' तुम्ही आपली मुले न्यावे किंवा इथे ठेवावे. हे तुमच्या खुशीवर अवलंबून आहे अन्यथा त्या मुलांची काळजी हा अनाथश्रम घेईल. या बातमीने त्यावेळी पुण्यातील सनातन्यांची माथी भडकली. यावरुन असे दिसते की, सामाजिक परिवर्तने ही योगायोगाने घडून येत नसतात ती कृतीशुर आणि करारी लोकांच्या निर्धारातूनच जन्म पावत असतात.

ISSN – 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC



त्या काळात वरिष्ठ वर्गीय ब्राह्मण विधवांना त्याचा मोठा फायदा झाला. कनिष्ट वर्गीय स्त्रींयानाही त्याचा फायदा झाला. त्यामुळे स्त्रीयांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. ख्रिस्ती मिशनऱ्याकडे जी अनाथ मुले जात ती जाणे बंद झाली. बोले तैसे चाले हा ज्योतीरावाचा बाणा होता.[४]

**द्विभार्या प्रथेला विरोध :-** जोतीबा - सावित्री यांचे वैवाहिक जीवन सुरु होऊन १२ वर्ष होऊन गेली तर त्यांना मुलबाळ झाल नाही. त्यामुळे त्यांच्या मित्रानी दुसरा विवाह करण्याचा सल्ला दिला. त्या काळात लग्नाच्या किमान दोन बायका आणि एक किंवा कितीही अंगवस्त्र बाळगणे प्रतिष्ठेचे मानले जात होते. म्हणून दुसरा विवाह करावा ही अत्यंत निष्ठूर अन् हदयशून्य चाल आहे असे जोतीरावांचे मत होते. व त्यानुसार त्यांनी स्वत:मूल नसतान दुसरा विवाह न करता बालहत्या प्रतिबंधगृहांतील काशीबाई नावाच्या स्त्रीचा मुलगा दत्तक घेतला. हा जोतिरावांचा पुरोगामीपणा होता.

**देवदासी प्रथेला विरोध :-** समाजात धार्मिक रुढीच्या नावा खाली देवादिकांच्या मुली सोडण्याची अनिष्ट प्रथा मोठया प्रमाणावर होती. त्या मुलीचा देवाशी विवाह लावून दिल्यानंतर मुलीला घरी जाता येत नसे तर तिला देवीच्या सेवेला अर्पण करण्याची प्रथा होती. या मुलीना देवदासी, जोगतीण, मुरळी असे म्हणतात. त्या धर्मगुरु, पैसेवालेआणि गावातील टगे यांच्या भोगदासी म्हणून जगतात. असेच एका देवादासीचे लग्न मुंबईत लावताना त्यांनी घोडागाडीतून पाहिले तेव्हा ते लग्न पोलीस आधिकाऱ्यांमार्फत थांबले. जोतीबावर व सरकारवर तेव्हा खुप टिका झाली या प्रयत्नात जोतिबांना यश आले नसले तरी त्यांनी त्या प्रथे विरुध्द आवाज उठविला .[६]

**केशवपणाविरुध्द चळवळ :-** विधवा स्त्रियांच्या दु:खात भर टाकणारी आणखी एक केशवपनाची अनिष्ट प्रथा हिंदु ब्राह्मण समाजात रुढ होती. म. फुलेंच्या सत्याशोधक चळवळीने याबाबत जनतागृही करुन स्त्री प्रश्नाच्या संबधानेआणखी एक पाऊल केशवपनाचा अन्याय ब्राह्मण स्त्रीयांवर होत आहे. म्हणून म. फुले आणि त्यांच्या अनुयायांनी नाभिक समाजात प्रचार करुन त्यांनाच केशवपण करावयाचे नाही म्हणून तयार केले. सन १८८४ च्या सुमारास विधवांच्या केशवपणाच्या संदर्भातील नाभिकांचा संप घडवून आणला. नाभिकांनी ही त्याचा स्वीकार करुन यापुढील काळात केशवपण करावयाचे नाही असा निर्धार केला हे फुल्यांचे यश होते.

१९व्या शतकातील महाराष्ट्रातील बहुजन समाज व स्त्रिया अज्ञानाच्या अंधकारत चाचपडत होत्या. इंग्रजी सत्तेच्या स्थापनेनंतर जो लाभ झाला. तो समाजातील वरिष्ट वर्गालच झाला होता . स्त्रियांना शिक्षण देऊन न्याय हक्कासाठी लढण्याची जाणीव फुल्यांनी करुन दिली. स्त्रि शिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंधकगृह, केशवपण या महत्वाच्या सामाजिक समस्येबाबत त्यांनी भरीव कार्य केले. शिक्षण समता या दोन शब्दांत त्यांच्या कार्याचे यथोचित वर्णन करता येईल. ते बोलघेवडे सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते. प्रत्येक बाबीच्या मुळीशी जावून ते विचार करायचे. म्हणून त्याना महाराष्ट्राचे ' मार्टिन ल्युथर ' म्हणून ओळखले जाते.

**संदर्भ सुची**

१. खरात शंकरराव, समाजिक चळवळीचा इतिहास, इंद्रायणी साहित्य प्रकाशन पुणे २००६. पृ. क्र. ३२
२. भगत रा. तु. , शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर २००१. पृ. क्र. ३२
३. किर धनंजय, म. जो. फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक पॉप्युलर प्रकाशन मुंबई २००८, पृ. क्र. ९८
४. डॉ. आगलावे सरोज, जोतीबा फुले सामाजिक तत्वज्ञान, पान नं. ९०
५. किट धनंजय , पृ.क्रमाक ९३ ते१०२
६. नरके हरी, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, नाग-नालंदा प्रकाशन पृ.१२